| डॉ. प्रमोद सावंत<br>संचालक,<br>विस्तार शिक्षण | # विस्तार शिक्षण संचालनालय<br>डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,<br>दापोली ४१५ ७१२ जिल्हा — रत्नागिरी |
|---|---|

दूर. क्र.०२३५८ —२८४३९३, २८२४११/२८२४१२/२८२४१३ विस्तार १०५ E-mail-debskkv@gmail.com

जा.क्र.डॉ.बासाकोकृवि/विशि/ ९११ /२०२३ दिनांक :— - 2 NOV 2023

प्रति,

____________________

____________________

____________________

**विषय :— रक्षक सापळे तयार करुन देण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.......**

विस्तार शिक्षण संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राकडे फळमाशीच्या रक्षक सापळयाचा साचा उपलब्ध असून सदर साच्याचा वापर करुन या केंद्राला कमीतकमी २५०० नग रक्षक सापळे तयार करुन देण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. रक्षक सापळा पूर्णतः प्लास्टिक पॉलिमरचा असून त्याचा नमुना या केंद्राकडे उपलब्ध आहे. तरी त्यानुसार रक्षक सापळा तयार करुन वेष्टनासहीत दापोली येथे पोहोच देण्याच्या प्रती नग दराचे दरपत्रक या कार्यालयास दिनांक <u>१६/११/२०२३</u> पर्यंत बंद लखोटयामध्ये कार्यालयीन वेळैत पोहोचतील अशा रितीने संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली ४१५७१२, जि. रत्नागिरी यांचे नावे व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र येथे पाठविण्यात यावे.

**दरपत्रके पुरविण्याकरीता अटी व शर्ती :—**

| | |
|---|---|
| १. | प्लास्टिक जार २ mm जाडी (ONHS) जार कॅप (P/20) थ्रेडेड प्लास्टिक पाईप (P/20), थ्रेडेड प्लास्टिक प्लेट (P/20), राऊंड डबी विथ कॅप (P/20) याचे साचे हे या केंद्रामार्फत देण्यत येतील. परंतु आकृती मधील नमूद प्लास्टीक हूक, दोन प्लास्टीक साखळया, ४ एम. एस. रिंग (२० सेमी व्यास) पॅकिंग बॉक्स छपाई करुन पुरवठादाराने द्यावयाचे आहे. (२२ सेमी लांबी X २२ सेमी रुंदी X २२ सेमी उंची) |
| २. | रक्षक सापळयाचा दर हा प्रति नगाचा सर्व करासहीत, वाहतुक खर्च अंतर्भुत करुन नमुद करावा. |
| ३. | आपण नमुद केलेल्या दरानुसार मागणी कमी जास्त होऊ शकते याची नोंद घ्यावी. |
| ४. | पुरवठादाराने रक्षक सापळयाचे पाचही साचे कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, दापोली येथून घेऊन जाणे व रक्षक सापळयासोबत पुन्हा कार्यालयात सुस्थितीत पोहोच करणे बंधनकारक राहील. सदर वाहतुकीसाठी येणारा खर्च देखील दरपत्रकात नमूद करावा. |

Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ५. | बंद लखोटयातील दरपत्रके दि. १६/११/२०२३ पर्यंत व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली, जि. रत्नागिरी, पिन ४१५७१२ या कार्यालयात पोहोच होणे आवश्यक आहे. |
| ६. | बंद लखोटयावर 'रक्षक सापळा' तयार करण्यासाठीचे दरपत्रक' असे स्पष्ट नमूद करावे. |
| ७. | विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. १७/११/२०२३ रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील. |
| ८. | टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. |
| ९. | दरपत्रके पुरवठाधारकाने जीएसटी क्रमांक नमूद करावा. |
| १० | जीएसटी क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधीकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेले पुरवठाधारकाचे लेटरहेड वरील दरपत्रक आवश्यक, सोबत पॅनकार्ड प्रत जोडणे आवश्यक आहे. |
| ११ | अधिकृत विक्रेता अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे तसेच संबधित कंपनीची अधिकृत दरसुची सोबत जोडावी. |
| १२ | दरपत्रकात संबधित सर्व करांचा उल्लेख असणे आवश्यक आहे. |
| १३ | कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरुस्त करण्याचा/नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवत आहे. |
| १४ | रक्षक सापळा तयार करण्याची ऑर्डर दिल्याच्या तारखेपासून रक्षक सापळे (पाच भाग) पुरवठा ३० दिवसात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली येथे कार्यालयीन वेळेत केला पाहिजे. |
| १५ | रक्षक सापळा हे विद्यापीठाचे तंत्रज्ञान असल्याने सदर सापळयाची प्रतिकृती/मोल्ड पुरवठादाराने विद्यापीठाव्यतिरिक्त अन्य कोणालाही विक्री/पुरवठा करु नये. |
| १६ | नमूना सापळा, त्याची आकृती व पॅकींग बॉक्सवर छापावयाचा मजकूर विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रामध्ये विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर पाहता येईल. |

संचालक
विस्तार शिक्षण
डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली

प्रत,
१) व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. बा. सा. को. कृ. वि. दापोली.
२) विद्यापीठ संकेतस्थळ

Scanned with OKEN Scanner